**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380,*
https://www.srjis.com/issues_data/224
***Peer Reviewed, Refereed & Indexed Journal, Nov-Dec, 2023, Vol- 12/80***

# मासेमारी आणि मच्छिमार समुदायाचा आर्थिक विकास – विकास सिद्धांताच्या आधारे विश्लेषण

**प्रा. डॉ.  तुळशीदास बळीराम रोकडे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी, महाराष्ट्र

***सारांश***

आर्थिक विकास हि संकल्पना गरजा पुर्ततेतील सक्षमता दर्शविते. मासेमारी व्यवसायातून हि सक्षमता कितपत     सध्या झाली अथवा नाही याचे अनुमान आपल्याला विकास सिद्धांताच्या आधारे वर्तविता येते.  आर्थिक संपन्नतेतून सामाजिक परिवर्तन शक्य होते, कोणत्याही लोक समुदायाचा विकास त्याच्या आर्थिक प्रप्तीशी जोडता येतो. नियोजनबद्ध सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास आर्थिक विकासाचे सिद्धांत पथदर्शक ठरतात.

विकास सिद्धांत हे समाज, व्यक्ती आणि अर्थव्यवस्थेशी संबंधित आहेत. अनेक वेळा सामाजिक परिस्थितीचे संदर्भ विकास सिद्धांताशी जोडता येऊ शकतात. देशाचे आर्थिक नियोजन, विविध समाज हितकारक योजना, सामाजिक समस्यावरील उपाययोजना  यासाठी विकास सिद्धांत महत्व पूर्ण आहेत. ॲडम स्मिथ, टॉमसस मँल्थस, डेव्हिड रिकार्डो, जॉन स्टच्यूअर्ट मिल व त्यांचा समीक्षक कार्ल मार्क्स यांच्या विकास विषयक निर्वचनातून आपल्याला समाजातील वास्तवता समजून घेणे अधिक सोपे होते.

**प्रस्तावना  :**

भारतात सु. चार हजार वर्षांपूर्वीच्या काळातही मासेमारी अस्तित्वात होती, असे सिंधू खोऱ्यातील मोहें-जो-दडो येथील उत्खननात आढळले आहे. मासेमारीचे मचवे, बंदरातील मासे उतरविण्याच्या जागा वगैरेंचे अवशेष प्रामुख्याने दिसतात. तसेच भाजलेल्या तांबड्या मातीच्या भांड्यावर महसीरसारख्या माशांची व ते पकडण्यासाठी वापरलेल्या गळांची चित्रे आढळतात. यावरून त्या काळात मासेमारीचा व्यवसाय अस्तित्वात होता, असे मानण्यास हरकत नाही. नंतरच्या म्हणजे चाणक्य (कौटिल्य) यांच्या काळात (इ.स. पू. सु. चौथे शतक) तर मत्स्यसंवर्धन हा एक प्रस्थापित व्यवसाय असावा असे दिसते. चाणक्य यांच्या *अर्थशास्त्र* या ग्रंथात असे नमूद केले आहे की, मासळीच्या उत्पन्नाच्या १/६ भाग सरकारने

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

तळ्याची भाडेपट्टी म्हणून घ्यावा व मासळीवरच्या जकातीचा दर माफक असावा. सुक्या मासळीचा उपयोग सैन्यातील जवानांसाठी कसा करावा, हेदेखील त्यात विशद केले आहे. दुष्काळी परिस्थितीत राजेरजवाड्यांनी व त्यांच्या मित्रांनी नदी, तलाव व समुद्रकिनारी जाऊन गळाने किंवा इतर रीतीने मासेमारी करून वा करवून प्रजाजनांना अन्न पुरविण्याचा प्रयत्न करावा, असेही त्यात नमूद केले आहे. भारतात फार प्राचीन काळापासून मत्स्योत्पादन, त्यावर करावयाच्या प्रक्रिया व त्यांची विक्री या गोष्टी एक ग्रामीण व्यवसाय म्हणून केल्या जात असत.

जगातील प्रगत देशांत व त्यातल्या त्यात नॉर्वे, बिर्टन व अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशांत एकोणिसाव्या शतकातच मत्स्योद्योगाच्या विकासासाठी निरनिराळे विभाग सुरू झाले. विसाव्या शतकात सामन व हॅलिबट यांच्या मासेमारीसाठी आंतरराष्ट्रीय आयोगही स्थापले गेले. सागरी संशोधनासाठी इंटरनॅशनल कौन्सिल फॉर एक्स्प्लोरेशन ऑफ द सी ही आंतरराष्ट्रीय संस्था कोपनहेगन येथे १९०२ मध्ये अस्तित्वात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व शेती संघटनेतर्फे जगातील सर्व राष्ट्रांच्या व त्यातल्या त्यात विकसनशील देशांच्या मत्स्योद्योगाच्या सुधारणेसाठी निरनिराळ्या योजना आखल्या जात आहेत आणि आर्थिक मदत व मार्गदर्शनही केले जात आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. भारतीय समाजातील विविध व्यवसायांपैकी एक – मासेमारी व्यवसायाचे वर्तमान स्वरूप समजून घेणे.

२. रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छिमार समुदायाची लोकसंख्या , त्यांचा व्यवसाय आणि त्यातून मिळणारा आर्थिक

लाभ अभ्यासणे .

३. मासेमारी आर्थिक विकासाचा मार्ग ठरू शकतो काय ? याची शहानिशा करणे.

४ . मासेमारी विकासाचा मार्ग ठरू शकते काय ? या विषयीचा आढावा घेणे.

**रत्नागिरी जिल्ह्यातील मासेमारी प्रकार**

रत्नागिरी हे भारतातील पश्चिम किनारपट्टीत वसलेले महाराष्ट्र राज्यातील एक शहर आहे. या भागाचा उत्तर-दक्षिण सुमारे १८० किमी लांबीचा आणि पूर्व-पश्चिम सुमारे ६४ किमी लांबीचा विस्तार आहे. हा जिल्हा १६.३० अंश ते १८.०४ अंश उत्तर अक्षांश आणि ७३.०२ अंश ते ७३.५३ पुर्व रेखांश या पट्टयामध्ये येते. जिल्हयाचे एकूण भौगालिक क्षेत्र ८३२६ चौ कि.मी. आहे. सह्याद्रीच्या डोंगरांनी या शहराला पूर्वेकडून वेढले आहे. या डोंगरांच्यापलीकडे सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्हे आहेत. शहराच्या उत्तरेला रायगड जिल्हा आहे, तर पश्चिमेला अरबी समुद्र आणि दक्षिणेला सिंधुदुर्ग जिल्हा आहे. रत्नागिरी साधारणतः 3 भागांत विभागली जाऊ शकते.

समुद्र किनाऱ्यालगतचा प्रदेश – हा प्रदेश साधारणतः समुद्रकिनाऱ्यापासून १० ते १५ किमीपर्यंत विस्तारला आहे आणि हा भाग समुद्रसपाटीपासून कमी उंचीवर आहे आणि इथे सुमारे २५०० मि.मी. पाऊस पडतो. या क्षेत्रातील बहुतांश व्यवसाय हे समुद्राशी निगडित आहे. या परिसरात असंख्य किनारे, खाडी, समुद्र किल्ले, बंदरं , गरम पाण्याचे झरे, लेणी, मंदिरे आणि इतर धार्मिक स्थळे, निसर्गरम्य स्थळे आहेत तसेच हे शहर काही महान व्यक्तिंचे जन्मस्थान आहे. पर्यटन क्षेत्रामध्ये प्रामुख्याने आंतर्देशीय व समुद्री जलमार्ग, समुद्री उद्याने, समुद्रपर्यटन, नौकाविहार, पाणबोटी , मासेमारी यासारख्या जल क्रीडा समाविष्ट आहेत. परंतु रस्त्यांची सुविधा व्यवस्थित नसल्यामुळे इथे पोचणेच कठीण आहे.

डोंगरी प्रदेश – ह्या प्रदेशाचा विस्तार सह्याद्री पर्वताच्या पश्चिमेकडील उतारापासून १० ते १५ कि.मी. पर्यंत आहे. हा प्रदेश समुद्रसपाटीपासून थोडा उंचीवर आहे. इथे सुमारे ३५०० मि.मी. पाऊस पडतो. जरी जंगलं जलद गतीने नष्ट होत असली तरी या प्रदेशाचा बहुतांश भाग हा जंगलांनीच आच्छादलेला आहे. पश्चिमेचा वारा वाहणाऱ्या ठिकाणी तापमानात घट आढळते. या परिसरात डोंगरी किल्ले, घाट रस्ते, जंगले, वन्यजीवन इत्यादींचा समावेश आहे. या भागात अनेक ठिकाणी मनोरम्य दृश्ये आहेत. पर्यटकांसाठी याठिकाणी वन्य जीवन निरीक्षण, जंगल सफर, पक्षी अभयारण्य, ट्रेकिंग, हायकिंग, हॉलिडे रिसॉर्ट्स यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

१ मच्छिमारांच्या आर्थिक क्रिया – पतसंस्थांचे योगदान

१. विकास योजना आणि पतसंस्था या मार्फत मच्छिमारांची झालेली प्रगती

२. मासे विक्रीची प्रक्रिया

**मच्छिमारी पुढील आव्हाने आणि त्यांची सोडवणूक**

सागरातील प्रवाह, पाण्यात मिसळलेला ऑक्सिजन वायू, माशांची जननक्षमता व मरणाधीनता यांचाही माशांच्या उत्पादनावर परिणाम होतो. याबरोबरच मच्छीमाराचे तांत्रिक कौशल्य, त्याची अवजारे (जाळी व नौका), मासेमारी क्षेत्राचे जवळील बंदरापासूनचे अंतर, माशांच्या स्थलांतराचे ज्ञान, पकडलेले मासे बाजारात नेईपर्यंत खरा न होऊ देण्याची काळजी हे सर्व घटकही मत्स्योत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. समुद्र जरी कितीही विस्तीर्ण असला, तरी त्याच्या क्षेत्रफळावर मत्स्योत्पादन अवलंबून नसते. किनाऱ्याजवळील पाण्यातील मासेमारी ही कमी खर्चाची व जास्त लाभदायक असते. खोल पाण्यात माशांची संख्या कमी असते व ते पकडण्यासाठी तुलनेने जास्त मेहनत व खर्च करावा लागतो.

बहुतेक देशांत प्राचीन काळी मासेमारीच्या पद्धती स्वतंत्र रीत्या अस्तित्वात आल्या असाव्यात व त्यांत गरजेनुसार सुधारणा झाल्या असाव्यात. मध्ययुगीन काळात काही देशांतील विशेषतः स्पॅनिश, पोर्तुगीज, फ्रेंच व डच या लोकांनी घाडसी सागरी सफरी केल्या व यामुळे दूरदूरच्या देशांचे परस्परांशी संबंध आले आणि ज्ञानाची व अनुभवाची देवघेव झाली. यामुळे मासेमारीच्या पद्धतींतही सुधारणा घडून आल्या. व्हान

ब्रॅन्ट यांच्या योजनेप्रमाणे सध्या अस्तित्वात असलेल्या पद्धतींचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल : (१) कोणत्याही साहित्याशिवाय (नुसत्या हाताने), (२) माशास जखमी करून, (३) गुंगी आणून, (४) गळ वापरून (आमिष लावून), (५) सापळे वापरून, (६) नसराळ्यासारखी स्थिर जाळी वापरून, (७) खोळीसारख्या ओढ जाळ्याने (ट्रॉल), (८) दोन्ही टोकांनी खेचण्याच्या जाळ्याने (पेरा, राणप, घोळवा), (९) वेष्टन पद्धतीने, (१०) उडणारे मासे अडवून, (११) जाळ्यात उचलून, (१२) जाळे फेकून, (१३) जाळ्यात गुंतवून, (१४) अडथळेवजा जाळे वापरून, (१५) इतर साधनांचा उपयोग करून.

देशभरातील सागरी मत्स्य उत्पादनात २०१९ साली २.१ टक्कय़ांची वाढ झाली असताना राज्यातील मत्स्य उत्पादन मात्र ३२ टक्कय़ांनी घसरले आहे. अरबी समुद्रात झालेल्या चक्रीवादळांमुळे मासेमारीच्या दिवसांवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे सेंट्रल मरिन फिशरीज रिसर्च इन्स्टिटय़ूटच्या (सीएमएफआरआय) अहवालात मांडण्यात आले आहे. मात्र त्याचबरोबर यांत्रिकी बोटींच्या बेबंध मासेमारीमुळेदेखील मासेच कमी होत असल्याचे मच्छिमार संघटनांचे म्हणणे आहे.

देशभरातील सर्व किनारी राज्यांतील मत्स्य उत्पादनाचा आढावा सीएमएफआरआयकडून दरवर्षी घेतला जातो. त्यानुसार देशात ३५ लाख ६० हजार टन मत्स्य उत्पादन झाले आहे. तर राज्यात एकूण २.०१ लाख मत्स्य उत्पादन आहे. हे प्रमाण देशातील एकूण मत्स्य उत्पादनाच्या ५.६ टक्के असून, मत्स्य उत्पादनात राज्याचा सातवा क्रमांक आहे.

राज्यातील मत्स्य उत्पादनात बोंबील तिसऱ्या क्रमाकांवर असून, त्यामध्ये तुलनेने कमी घट झाली आहे. कोळंबीच्या उत्पादनातील घट मर्यादीत असली तरी पहिल्या पाच क्रमांकातील सर्वच माशांच्या उत्पादनात घट दिसून येते. एकूण उत्पादनात खोल पाण्यातील आणि महासागरी मासे अधिक आहेत.

गेल्या वर्षी अरबी समुद्रात सात वेळा चक्रीवादळ पूर्वपरिस्थिती (सायक्लोनिक डिस्टर्बन्स) तयार झाली. आतापर्यंतचे (१८९१ ते २०१८) हे सर्वाधिक प्रमाण असून यापूर्वी १९९८ मध्ये सहा वेळी चक्रीवादळ पूर्वपरिस्थिती झाली होती. या पूर्वपरिस्थितीचे चक्रीवादळात रुपांतर होऊन अरबी समुद्रात तीन चक्रीवादळे तयार झाली. या सर्व काळात मासेमारीचे दिवस घटले. त्यातच गेल्या वर्षी मान्सूनचा लांबलेला परतीचा प्रवासामुळे मच्छिमारांनी समुद्रात जाता आले नव्हते. तर कैकवेळा समुद्रावरील बदलत्या परिस्थितीमुळे अर्ध्यातून परत यावे लागले होते. पावसाळा संपता संपता येणाऱ्या मासळीचा उपयोग प्रक्रिया उद्योगात मोठय़ा प्रमाणात केला जातो, मात्र त्यांची आवक घटली.

'दुसरीकडे गेल्या ४५ वर्षांत यांत्रिक बोटींमध्ये चार पट वाढ झाली. परिणामी वेळी-अवेळी होणाऱ्या मासेमारीचे प्रमाण वाढले. त्याचा फटका मत्स्यसाठय़ावर, पुर्नरुत्पादनावर होत असल्याचे,' अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष दामोदर तांडेल यांनी सांगितले.

एलईडी, पर्सिसीन नेट अशा माध्यमातून होणाऱ्या मासेमारीवर बंदी असली तरी त्याबाबत कानाडोळा होत असून भविष्यात मासेमारीवरील गंभीर परिणामांवर तातडीने उपाय करावेत अशी मागणी सर्वच मच्छिमार संघटनांकडून केली जात आहे.

**विकास सिद्धांत :**

आर्थिक वृद्धी ही संकल्पना स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पादन, दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन, दरडोई निव्वळ देशांतर्गत उत्पादन आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पादन यांसारख्या संख्यात्मक पद्धतीने अर्थव्यवस्थेच्या वाढीची स्थिती दर्शवतात. थोडक्यात, शाश्वत पद्धतीने स्थूल राष्ट्रीय उत्पादनामध्ये होणारी वाढ हा आर्थिक वृद्धी या प्रक्रियेचा महत्त्वाचा पलू मानला जातो. आर्थिक विकास ही संकल्पना आर्थिक आणि सामाजिक प्रगतीची निर्देशक मानली जाते. आर्थिक विकास ही प्रक्रिया अर्थव्यवस्थेमधील भौतिक व कल्याणकारी विकासामध्ये होणारी सुधारणा स्पष्ट करते. ज्यामध्ये गरिबीचे निर्मूलन, साक्षरतेमध्ये होणारी वाढ, बेरोजगारीचे उच्चाटन आणि आर्थिक विषमता कमी करून आर्थिक समानता यांसारख्या गोष्टीमध्ये उत्तरोत्तर होणाऱ्या प्रगतीचा आलेख दर्शवते. थोडक्यात, आर्थिक विकास या प्रक्रियेची व्याप्ती आर्थिक वृद्धीपेक्षा मोठी आहे. आर्थिक विकास हा उत्पादनामध्ये होणाऱ्या वाढीव्यतिरिक्त उत्पादन रचनेमध्ये होणारे बदल व उत्पादनक्षमतेच्या आणि उपलब्ध साधनसंपत्तीच्या योग्य विभाजनाची माहिती देते व सामाजिक न्याय या तत्त्वाची सुनिश्चितता दर्शवते. उपरोक्त चर्चेतून असे स्पष्ट होईल की, यातील आर्थिक वृद्धी ही संकल्पना अर्थव्यवस्थेविषयी सामान्यत: संख्यात्मक चित्र दर्शवते आणि आर्थिक विकास ही संकल्पना अर्थव्यवस्थेविषयी संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही बाबींचे चित्र दर्शवते. अर्थात आर्थिक वृद्धीपेक्षा आर्थिक विकास या संकल्पनेचा परीघ मोठा आहे. त्यामध्ये आर्थिक व सामाजिक प्रगतीचे चित्र दिसून येते. याउलट आर्थिक वृद्धी ही संकल्पना अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग दर्शवते.

**मच्छिमारी व्यवसाय विकास आणि विकास सिद्धांत**

आर्थिक विश्लेषणामध्ये अप्रगत वा अविकसित, अर्धविकसित राष्ट्रांची आर्थिक स्थिती, त्याचे स्वतंत्र गतिनियम यांची स्वतंत्र दखल घेतली जात नसे. वर उल्लेखिलेली सनातन परंपरा व त्यानंतरची विकसित झालेली नव-सनातन परंपरा यांमध्ये विकसित झालेल्या सैद्धांतिक अन्वेषण-पद्धतींचा वापर अविकसित अर्थव्यवस्थांच्या विश्लेषणासाठी करण्यात येऊ लागला. या अर्थव्यवस्थेतील मध्यवर्ती प्रश्नांचे स्वरूप काहीसे भिन्न होते. परंतु ती वैशिष्ट्ये सामावून घेऊन वृद्धीविषयक व विकासविषयक प्रश्नांची हाताळणी करण्यात येऊ लागली. त्याच प्रक्रियेत काही सैद्धांतिक प्रतिमाने व ऐतिहासिक विवेचन (इतिहासाचे परिशीलन वा नवे आकलन) उदयास आले.

औद्योगिकीकरणाच्या व आर्थिक अभिवृद्धीच्या परिणामी व त्याच्या जोडीने अन्य सामाजिक परिवर्तने होत गेली. उदा., सर्वसाधारण शिक्षणाचा प्रसार व सार्वत्रिक अंगीकार, स्त्रीशिक्षणाचा प्रसार, स्त्रीस्वातंत्र्य, सामाजिक प्रतिष्ठा, स्त्रीहक्क, स्त्रियांचा आर्थिक सहभाग यांमध्ये लक्षणीय सुधारणा (वाढ व परिवर्तने), रोगराईला आळा, धर्मसंस्थांचा प्रत्यक्ष राजकीय पगडा व प्रभाव कमी होणे इत्यादी. आर्थिक अभिवृद्धीच्या जोडीला जीवनमानात होणारे गुणात्मक बदल, संस्थात्मक पुनर्घटन किंवा परिवर्तन या सर्व वैशिष्ट्यांना समुचित रीत्या 'विकासप्रक्रिया' म्हटले जाते. विकासप्रक्रियेचे गुणात्मक वर्णन व संख्यात्मक मापन हे निव्वळ आर्थिक अभिवृद्धिपेक्षा अधिक व्यामिश्र व व्यापक बनते.

'विकास' या संज्ञेचा अर्थ व्यापक व व्यामिश्र असल्यानेच विकासाचे मापन बहुपेडी व बहुपदरी असावे लागते. त्यामुळे विकासाच्या मापनात संख्याशास्त्रीय संदिग्धता व समस्या अधिक असतात. विकासाची व्याख्या, निकष तसेच गुणवैशिष्ट्ये यांबाबत संशोधकांमध्ये किंवा धोरणकर्त्यांमध्ये एकवाक्यता आढळत नाही. यामध्ये वेगवेगळ्या विचारप्रणालींनुसार, जीवनमूल्यांनुसार व वैयक्तिक पसंतीनुसार मतभेद विपुल प्रमाणात आढळतात. उदा. औद्योगिकीकरण विकासात्मक नसून विनाशी व अदूरदृष्टीचे आहे, कमीत कमी भौतिक-मानसिक गरजांवर आधारलेली निसर्गाश्रयी समूहनिष्ठ अर्थव्यवस्था हाच खरा विकास होय, असे प्रतिपादन करणारे विचारवंत व गट आहेत. तात्पर्य, विकास हे सर्वमान्य ध्येय असले, तरी त्या ध्येयाचे स्वरूप व अन्वय वा आकलन आत्यंतिक भिन्न भिन्न प्रकारचे असू शकते.

विकासाचे अर्थशास्त्र या शाखेमध्ये काही प्रश्न अधिक आवर्जून, ठळकपणे, वारंवार व विविध दृष्टिकोनातून हाताळले गेले आहेत. या प्रश्नाची उकल करण्यासाठी जे अमूर्त सिद्धांतन किंवा तार्किक युक्तिवाद अंगिकारण्यात आले, यालाच 'विकास-प्रतिमाने' असे संबोधले जाते. या प्रश्नांची व प्रतिमानांची स्थूल निर्देशात्मक यादी पुढीलप्रमाणे :

(१) अविकसित देशांमध्ये दारिद्र्याचे दुष्टचक्र कार्यरत असते. कमी दरडोई उत्पन्न म्हणून कमी बचत, बचत कमी म्हणून गुंतवणूक कमी, गुंतवणूक कमी म्हणून संचित भांडवलसामग्री कमी, परिणामी उत्पादकता कमी म्हणून पुन्हा उत्पन्न कमी. असे हे तथाकथित दुष्टचक्र कशा रीतीने तोडता येईल? (रेग्नार नर्क्स, रोझेन्स्टाइन रोदँप्रणीत प्रतिमान).

(२) अविकसितपणा दारिद्र्याचे दुष्टचक्र तोडण्यासाठी खाजगी उद्यमशीलता व बाजारयंत्रणा यांवर विसंबून चालेल का?–की त्याकरिता शासकीय हस्तक्षेप, सार्वजनिक क्षेत्र–गुंतवणूक, तत्संबंधी नियोजन यांची गरज आहे?

(३) विकासासाठी काही 'क्षेत्रे' अथवा 'उद्योग' पायाभूत मानता येतात का? त्यांचा विकास प्राधान्याने साधावा काय? सर्व क्षेत्रांचा एकसमान दराने समतोलात्मक विकास व्हावा, की काही उद्योगांचा अधिक जोमाने परंतु 'असमतोल तत्त्वाने' विकास व्हावा? (हर्शमन, व्हॉन नॉयमान, रोदँप्रणीत प्रतिमाने).

(४) अभिवृद्धीला व विकासाला परकीय व्यापारामुळे चालना मिळते की खीळ बसते? परकीय व्यापाराच्या माध्यमातून भांडवल मिळते की खीळ बसते? परकीय व्यापाराच्या माध्यमातून भांडवल संचय, तंत्रज्ञान प्राप्ती (आवश्यक त्या प्रमाणात व हव्या त्या प्रकारची) साध्य होऊ शकते का ? अविकसित देशांच्या निर्यातक्षमतेचे स्वरूप, त्यांच्या निर्यात वस्तूंना मिळाणाऱ्या व्यापारशर्तीची दिशा व त्यातील दीर्घकालीन कलप्रमाण विकासास पोषक आहेत का ? (सिंगर प्रेबिश, लुईस नर्क्स, भगवतीप्रणीत प्रतिमाने).

(५) आयात–पर्याय व निर्यात–अभिमुखता यांपैकी काय अधिक श्रेयस्कर? या दोन्हींचा संतुलित वापर नियोजनाकरवी साध्य होतो, की बाजारयंत्रणा/व्यवस्थेकडून त्याची अधिक योग्य व संतुलित हाताळणी होते?

(६) परकीय चलनाची चणचण ही अपरिहार्य मर्यादा असते का? विकासाबरोबर या मर्यादेचे स्वरूप कोणत्या दिशेने व मार्गाने बदलते? परकीय भांडवल नियंत्रित ठेवावे की खुले ? चलननियंत्रण, परकीय गुंतवणूक-मर्यादा यांसारखे उपाय कोणत्या स्थितीत किती प्रमाणात प्रभावी ठरतात ? आंतरराष्ट्रीय व्यापार-धोरण व परकीय भांडवलाची आयात यांचा परस्परमेळ काय असावा? स्थानिक (एतद्देशीय) उत्पादकांना आयातशुल्क, आयातनिर्बंध, परकीय भांडवलास मज्जांव इ. स्वरूपात किती मर्यादेपर्यंत संरक्षण देणे श्रेयस्कर आहे? देशीय बचत, परकीय गुंतवणूक यांचा परस्परसंबंध कसा असतो? उत्पादनघटकांवर आंतरराष्ट्रीय व्यापाराचे परिणाम काय असू शकतात? (फिंडले, जगदीश भगवती, ब्रेशरप्रणीत प्रतिमाने).

(७) वाढत्या लोकसंख्येचे साधनसामुग्रीच्या उपलब्धतेवर होणारे संभाव्य परिणाम, आर्थिक-सामाजिक विकासात्मक स्थित्यंतरे व लोकसंख्येतील रचनात्मक–गुणात्मक स्थित्यंतरे यांचा परस्परसंबंध काय? (कोल हूव्हर सिद्धांत).

(८) कुटुंबाधारित शेती, त्यामधील छुपी बेकारी, वरकड श्रमसंख्या, तथाकथित अमर्याद श्रमपुरवठा, पारंपारिक शेतीमधील कमी उत्पादकता व निम्न क्रमशक्ती यांचा औद्योगिकीकरणावर काय परिणाम होतो? एकीकडे पुढारलेले आधुनिक औद्योगिक क्षेत्र व दुसरीकडे मागास, पारंपारिक कुटुंबाधारित कृषि-अवलंबी व्यवस्था अशा द्वैतग्रस्त परिस्थितीमधून कोणते संक्रमणात्मक मार्ग, पर्याय व प्रक्रिया उद्‌भवतात? कमी दरडोई वेतन/उत्पन्न देणाऱ्या क्षेत्राकडून सापेक्षतया अधिक वेतन देणाऱ्या औद्योगिक/आधुनिक क्षेत्राकडे श्रमशक्ती स्थलांतरित होते का? किती प्रमाणात होते? आधुनिक

औद्योगिक क्षेत्र त्या सर्वांना सामावून घेऊ शकते का? (डब्ल्यू. ऑथर ल्युईसप्रणीत द्वैतवादी प्रतिमाने; फाई-रॅनिस, हॅरिस टोडॅरो, स्टिगलिट्झ, प्रणववर्धन, जॉरगेन्सन, भगवती–श्रीनिवसन प्रभृतींचे सैद्धांतिक विवेचन तसेच अलीकडील उत्पन्न–विभाजन मागणी, गुंतवणूक यांचे द्वैतग्रस्त परिस्थितीतल सामाजिक विभेदीकरणात्मक (डिस्-आर्टिक्यूलेशन) परिणाम यावर लक्ष्य केंद्रित करणारी डी-जान्व्हरीप्रणीत प्रतिमाने).

(९) देशांतर्गत एक क्षेत्र दुसऱ्या क्षेत्राची वसाहत बनू शकते का? एका क्षेत्राचा विकास क्षेत्राच्या शोषणावर व व्यापारशर्तींना हवी तशी मुरड घालून केलेल्या असमान विनिमयावर आधारित होतो का? असा असमान विनिमय विकासाला पोषक असतो का? ती विकासाची अपरिहार्य चाल (स्ट्रॅटेजी) आहे का? (असमान विनिमय प्रतिमाने–उदा., प्रेओब्राझिन्स्की, बुखारिन, इम्यॅन्युएल, अँडरसनप्रणीत युक्तिवाद वा प्रतिमाने, शेतीमाल-किंमतीविषयक प्रतिमाने). अशाच युक्तिवादानुसार प्रगत-अप्रगत उत्तर खंडीय व दक्षिण खंडीय देशांमधील आर्थिक व व्यापार-व्यवहार स्पष्ट करता येतो का ? (पॉल बरान, आंद्रे गुदरफ्रँक इ. प्रणीत विवेचन).

(१०) विकसित, निम्नविकसित व अंविकसित अशा गटांत झालेले जगाचे विभाजन उत्तरोत्तर अधिक विषम व तीव्र बनेल, की त्यांमधील तफावत धीम्या गतीने का होईना पण कमी होत जाईल? राजकीय वर्चस्वावर आधारलेला वसाहतवाद संपून आर्थिक वसाहतवाद छुप्या मार्गाने वाटचाल करतो आहे का ? विकसित देश व अविकसित देश यांच्यात निव्वळ व्यापार, भांडवल-गुंतवणूक, घटक–हस्तांतर–स्थानांतर या बाजारप्रक्रियांमार्फत चालणारे व्यवहार विकासाला पोषक की घातक?–अशा व्यवहारांना वित्तीय चालना व सहकार्य देणाऱ्या, तसेच विकासात्मक प्रकल्पांसाठी वित्तपुरवठा करणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था आहेत–उदा.,आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, आशियाई विकास बँक इ. या संस्थांची धोरणे विकासाला कितपत अनुकूल आहेत? प्रगत व अविकसित जगांतील तफावत दूर करण्यासाठी काही जाणीवपूर्वक संघटित प्रयत्न करता येतील का ? त्यासाठी साहाय्य–अनुदान या स्वरूपात भांडवल–बचत–हस्तांतरण करता येईल का? त्याचे स्वरूप बंधयुक्त असावे की बंधमुक्त?

(११) सरकारी हस्तक्षेप किती मर्यादेपर्यंत विकासाला पोषक असतो? जे उशीराने विकसित झाले त्यांच्या विकासप्रक्रियेत काही समानधर्मी वैशिष्ट्ये आढळतात का? विकासाला उशिरा सुरुवात होण्याचे फायदे–तोटे कोणते? (गेर्शेनक्रॉनप्रणीत विवेचन). तसेच कोणत्या टप्प्यानंतर विकसप्रक्रिया स्वयंनिर्वाही, स्वयंगतिशील बनते?

वर उल्लेखिलेले प्रश्न या विषयांच्या ढोबळ आराखड्याच्या स्वरूपात आहेत. त्यातील अनेक अंगोपांगांचा अधिक सूक्ष्म, सविस्तर व बहुशाखीय अन्वेषण-पद्धतीने अभ्यास या शाखेत होतो. वरील विषयांचे उपांग म्हणून त्याचप्रमाणे स्वतंत्र विषय म्हणून अनेक समस्यांची हाताळणी या शाखेत होते.

**निष्कर्ष :**

अभ्यास विषयाच्या अनेक बाजूंचा विचार करता काही बाबी पुढील प्रमाणे स्पष्ट होतात.

औद्योगिकीकरणाच्या व आर्थिक अभिवृद्धीच्या परिणामी व त्याच्या जोडीने अन्य सामाजिक परिवर्तने होत गेली.त्याचासकारात्मक परिणाम मासेमारी करणाऱ्या समुदायावर झाला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील मासेमारी करणाऱ्या व त्यावर उपजीविका करणाऱ्या समुदायाच्या संख्येतील लक्षणीय वाढ झाली असून विकास प्रक्रियेतील अनेक घटक त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. यांत्रिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो जो विकास सिद्धांताचा उर्जा वापराचा सिद्धांत स्पष्ट करतो. गुंतवणूक, भांडवल, उत्पादन प्रक्रिया व विक्री व्यवसाय यावर आधुनिकीकरणाचे प्रभाव दिसून येतात.

**संदर्भ (**Reference):

१. रत्नागिरी जिल्हा आर्थिक आणि सामाजिक सांख्यकी समालोचन २०१८

२. कर्ला मच्छिमारको. ओपरेटीवसोसायटी संस्थेचा वार्षिक अहवाल २०१६.

३. बाल. द. बा., देशमुख नंदिनी, महाराष्ट्राची सागरी मत्स्य संपत्ती , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ , मुंबई.

**E resources**

https://fisheries.maharashtra.gov.in/gr-and-circulars

http://oldbookreview.lbp.world/PublishedBooks/18.pdf

https://marathi.krishijagran.com/animal-husbandry/various-opportunities-for-self-employment-in-the-fisheries-business/

https://mr.vikaspedia.in/education/childrens-